# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २५/०३/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील वाकेश्वर शिवार येथे दिनांक २०/३/२२ चे १८.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— निरंजन बकारामजी डोंगरे वय ३६ वर्ष रा. वाकेश्वर यांचे घराचे दाराचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी आलमारीतील सोने—चांदीचे दागीने असा एकुण ४८,०८४/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राय मो. नं. ९४२३६००४९४ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा जलालखेडा येथे दिनांक २५/०१/२२ चे ०८. ०० वा. ते ०८.३० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— किशोर रमेशराव वानखेडे वय ४७ वर्ष रा. वार्ड नं. ०१ बाजार चौक, जलालखेडा ता.नरखेड यांचे राहते घरी आरोपी नामे १) सौ. दुर्गा किशोर वानखेडे वय ३८ वर्ष, रा. जलालखेडा ह.मु सावरखेड ता.मोर्शी जि. अमरावती, २) मनोहर सिताराम चन्ने, वय ४५ वर्ष, ३) सौ. अनुसया मनोहर चन्ने वय ४० दोन्ही रा. सावरखेड ता.मोर्शी जि. अमरावती यांनी तबला दुरूस्तीचे दुकानातुन १) ४ तबले किंमती १८,०००/—रू. २) दोन बॅग मधील तबला दुरूस्तीचे सामान किंमती २,०००/—रू. ३) दुकानात ठेवलेल्या ५००/—रू. च्या २५ नोटा एकुण १२,५००/—रू. तसेच फिर्यादीची पत्नी राहत असलेल्या घरून दोन कुलर किंमती १०,०००/—रू. ५) लोंखडी दिवान/पलंग कि. १०,०००/—रू. ६) काशाचे गडवे ४ कि. १०००/—रू. असा एकुण कि. ५३,५००/—रू. चा मुद्देमाल फिर्यादीची परवानगी न घेता दुकानातुन घरातुन आरोपीतांनी नेला. नमुद आरोपी हे फिर्यादीचे नातेवाईक असल्याने आज पावेतो परत आणुन देण्याची वाट बघीतल तर परत न आणुन दिले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३८०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रिधोरकर मो.क्र. ८००७६७१९८६ हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ०२ किमी. अंतरावरील मौजा मोहपा रोडवर बिपीएड कॉलेजच्या मागे येथे दिनांक २०/०३/२०२२ चे १०.३० वा. ते दिनांक २२/०३/२०२२ चे ०७.०० वा. दरम्यान **मनोहर सोमाजी कुहीकर(मृतक), वय ६० वर्ष, रा. जिचकार हॉल जवळ ईतवारी पेठ उमरेड** हे जनावर राखण्याचे कामाने मोहपा रोडकडे गेले. त्यादरम्यान ते शौचास गेले असावा त्यामुळे ते मोहपा रोडवरील बीपीएड कॉलेज मागे असलेल्या गोठाला लागुन असलेल्या खदानीच्या खडयावर गेले असतांना त्यांचा पाय हा लहानपणापासुन कमजोर असल्याने तोल जावुन पाण्यात पडले व पाण्यात बुडुन मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पवन मनोहर कुहीकर, वय २८ वर्ष, रा. जिचकार हॉल जवळ ईतवारी पेठ उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मनोज वाघ मो. क्र. ९४२०७५६७५१ हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. काटोल – दिनांक ०१/०४/२०२१ चे दिनांक २४/०३/२०२२ चे १५.०० वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्यीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– पंकज अरूण गायकवाड, वय २६ वर्ष, रा. अण्णभाउ साठे नगर, काटोल याने तिला लग्नाचे आमिष दाखवुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले. तसेच आरोपीने फिर्यादीला व फिर्यादीच्या मुलीला धमकी दिली कि, 'तुम्ही जर पोलिस स्टेशनला तक्रार केली तर तुम्हाला जिवाने मारून टाकीन,' आरोपी हा फिर्यादीच्या मुलीला घेउन सध्या त्याचे राहते घरात राहत असुन तेथे तो मुलीला सतत मारहाण करून तिच्यावर अत्याचार करीत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३, ३६६(अ), ३७६(२),(जे),(२),(एन),३२३,५०६ भादंवि. सहकलम ४, ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि गुरूकर मो.क्र. ९६६५८३४९९९ या करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. वेलतुर – दिनांक २३/०३/२०२२ चे २१.०० वा. ते दिनांक २४/०३/२०२२ चे ०१.०० वा. चे सुमारास पो.स्टे. वेलतुर हद्यीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री डोर्लीकर मो.क्र. ९५९५६७८२३४ हे करीत आहे.

# अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा माळणी येथे दिनांक १८/०३/२२ वे १२.०० वा. सुमारास आरोपी नामे– **बबन भगवान शेंडे (मृतक), वय ४५ वर्षे रा. टेंभरी ता. कुही** हे त्यांच्या एमएच–४०/एएन– १६५९ क्रमांकाची मोटरसायकलने कामावरून घरी परत येत असतांना त्यांची मोटरसायकल स्लिप झाल्यांने त्यांना गंभीर मार लागला व उपचारा दरम्यान दि. १९.०३.२२ रांजी मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा राजेश कावळे मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री ठमके मो.क्र. ८७८८५५२१३९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील टाकळघाट येथे दिनांक २०/०३/२२ वे १९.४५ वा. सुमारास डायल ११२ वर कॉल आल्याने पो.स्टे. एमआयडीसी बोरी चा पोलिस स्टॉफ घटनास्थळी गेले असता टाकळघाट येथील विठ्ठल मंदिर जवळील सिमेन्ट रोडचे कडेला मृतक अजय झनकलाल धुर्वे वय ४० वर्ष रा. किन्ही ता. हिंगणा जि. नागपूर हा मृत अवस्थेत आढळून आला. मृतकास कोणत्यातरी अज्ञात आरोपीने आपले ताब्यातील अज्ञात वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून जोरदार धडक मारल्याने गंभीर जखमी होउन मरण पावल्याचे मर्ग के ०८/२२ कलम १७४ जा. फौ. चे चौकशी वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस निरीक्षक श्री अशोक कोळी पो.स्टे. एमआयडीसी बोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी १३४(अ), १३४ (ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**